


टोनी अलामो ख्रिश्चन मंत्रालय
जागतिक वार्तापत्र
न्यू जेरूसलेम
जगभरातील चर्च
पॅस्टर टोनी अलामो
द अलामो ख्रिश्चन नेशन
खंड 17700

# आपल्या पृथ्वीभोवती घिरटया घालणारे स्वर्गातील देवदूत !

**लेखक-टोनी अलामो**

“देवाचे रथ वीस हजार आहेत, हजारो हजार आहेत आणि प्रभू हा त्यांच्यातील एक आहे.” (स्तोत्रसंहिता ६८:१७). आजच्या उडत्या तबकड्या, ज्यांना यूएफओ म्हणून ओळखले जाते त्या ईश्वराचे रथ आहेत हे उघडच आहे. या तबकड्या म्हणजे परग्रहावरून आलेल्या काही अनोळखी वस्तू नसून त्या प्रत्यक्ष ईश्वराचे दूत असतात, त्यांनी ईश्वराच्या कायद्याविरूद्ध आणि मोक्षाच्या वारसदारांविरूद्ध होणाऱ्या गुन्ह्यांवर शतकानुशतके कडक नजर टेवली आहे.[१]



*टोनी आणि सुसान अलामो आणि त्यांचा गायकवृंद त्यांच्या १९७०चे दशक आणि १९८०च्या दशकाच्या सुरूवातीच्या वर्षांमध्ये त्यांच्या टिव्ही कार्यक्रमांत-*

हिब्रु १:१०-१४ मध्ये सांगितले आहे, “हे प्रभु, सुरुवातीला तू पृथ्वीचा पाया घातलास, आणि आकाश तुझ्या हाताचे काम आहे”: ती संपुष्टात येतील पण तू सतत राहशील, ते कापडासारखे जुने होतील. तू त्यांना अंगरख्यासारखे गुंडाळशील, तू त्यांना कपड्यासारखे बदलशील, पण तू नेहमी सारखाच राहशील, आणि तुझी वर्षे कधीही संपणार नाहीत. त्याने कधी एखाद्या देवदुताला असे म्हटले आहे की माझ्या उजव्या हाताशी बस [ जे त्याने केवळ येशु ख्रिस्ताला म्हटले] तोपर्यंत मी तुझ्या शत्रुंना तुझ्या पायतळी घालतो. ते सर्वजण सेवा करणारे आत्मे नव्हेत का ज्यांना मोक्षाच्या वारसदारांची सेवा करण्यासाठी पाठवण्यात आले आहे?”

ते देवाचे रथ ( ज्यांना बहुतांश लोक युएफओ म्हणतात) नसते तर सेवेसाठी पाठवलेल्या आत्म्यांना संतांच्या सत्कर्मांवर आणि दुर्जनांनी पृथ्वीवर केलेल्या भ्रष्टाचारावर दर दिवशी चोविस तस लक्ष ठेवणे कसे शक्य झाले असते? संतांना आशीर्वाद देण्यासाठी आणि दुष्टांना ताकीद, शाप देण्यासाठी, त्यांचा नायनाट करण्यासाठी कोणत्या देवदूताला कधी पृथ्वीवर पाठवायचे हे ईश्वराला जरी तो सर्वज्ञानी असला तरी, कसे समजले असते?

उदा. उत्पत्ति ३२:१२ मध्ये ईश्वर जेकबला म्हणाला, ज्याला त्याने नंतर इस्त्राएल नाव दिले “मी तुझे भले करीन; मी तुझी संतती वाढवीन आणि ती समुद्राच्या वाळू इतकी करीन; ती मोजता येणार नाही एवढी ती करीन.” तरी देखील राजा डेव्हिडने जेव्हा इस्त्रायलच्या सर्व पुत्रांची संख्या मोजायचे ठरवले तेव्हा, त्याच्या मनांत काय होते हे ईश्वराला माहित होते. याची सुरुवात अशी झाली. पहिले इतिवृत्त २१:१-२ सांगते की, “सैतान इस्त्रायलच्या विरोधात उभा राहिला आणि त्याने डेव्हिडला इस्त्रायलमधील लोकांची संख्या मोजण्यासाठी चिथावले. [देवाने म्हटले होते की त्यांची संख्या मोजता येणार नाही कारण ते अगणित आहेत (हिब्रु ११:१२)] डेव्हिडने, जोएबला आणि लोकांच्या राज्यकर्त्यांना [नेत्यांना] म्हटले, “जा, आणि दक्षिणेतील बीरशेबापासून ते उत्तरेतील दानपर्यंत इस्त्रायलमधल्या सर्व लोकांची संख्या मोजा, आणि मला सांग म्हणजे मला ते किती आहेत ते कळू शकेल.” जसे इव्हने मनापासून सैतानाच्या आज्ञेचे पालन केले त्याचप्रमाणे राजा डेव्हिडने देखील मनापासून सैतानाच्या आज्ञेचे पालन केले, आणि त्यांनी मनापासून म्हटले, “मी सर्वोच्च पदावरच्या ईश्वराप्रमाणे बनेन, आणि ईश्वराला जशी संख्या माहिति आहे तशीच मला पण ती माहिती होईल.” जर अॅडम आणि ईव्हने ईश्वराची आज्ञा पाळली नाही किंवा त्याचे म्हणणे ऐकले नाही म्हणून ईश्वर त्यांच्यावर इतका रागावला होता, की त्याने पृथ्वीवरील प्रत्येक जीवाला, मृत्यू, नरक आणि आगीच्या तळयात चिरंतन जळत रहाण्याचा शाप दिला असेल तर तो अशा अवज्ञेबद्दल आणि पापाबद्दल तसेच सैतानाच्या आज्ञेचे पालन केल्याबद्दल डेव्हिडला कसा सोडील?[२] ईश्वर माणसांमध्ये भेदभाव करत नाही.[३] जर त्याने अॅडम आणि ईव्हला त्याची अवज्ञा केल्याबद्दल शाप दिला असेल आणि राजा डेव्हिडला, जो त्याचा अत्यंत लाडका होता, त्यालाही त्याची अवज्ञा केल्याबद्दल शाप दिला असेल तर त्याची अवज्ञा केल्याबद्दल तो तुम्हाला आणि मला आणि इतर सर्वांना नक्कीच शाप देईल.[४]

जेव्हा डेव्हिडने जोएबला ईस्त्रायलमधील लोकांची संख्या मोजायला सांगितले तेव्हा जोएबने डेव्हिडला म्हटले, “इथे जेवढे लोक असतील त्यांची संख्या शंभर पटीने

*(पान २ वर पुढे सुरू)*

---

१ जेन. १८:२०-२२, १९:१-२५, नम. २२:२१-३५, २ सॅम. २४:१०-१६, २ राजे ६:८-१७, २ क्रोन. २०:१-२९, ३२:१-२२, साल. ३४:७, ३५:४-५, ६८:१७, डॅन. ६:२१-२२, झेक. १:७-२१, २:१-५, चॅप.-४, मॅथ. २८: १-७, अॅक्ट्स ५:१७-२४, १२:१-१२, २१-२३, रेव. ७:१-२, प्रकरण ८, ९:१-५, १३-२१, १४:६-११, १५-२०, १५:१, ५-८, प्रकरण. १६, १८:१-६, २१, १९:१७-१८, २०:१-३ २ जेन. २:१६-१७, ३:१-१९, रोम. ५:१२-१८, १ कोर. १५:२२, ४७ ३ लेव. १९:१५, डयुश. १:१७, १६:१९, १ सॅम. २६:२३, १ किंग्ज८:३२, २ क्रॉन. ६:२३, १९:७,साल्म ९:८, प्रोव. २४:२३, २८:२१, इसा. ४५ अॅक्ट्स १०:३४,रोम. २:११, एफि. ६:९, कोल. ३:२५, जेम्स २:१-१०, १ पीट. १:१७, रेव. १५:३ ४ . जेन ३:१-१९, एक्स. २३:२०-२१, डयूश. ११:२६ -२८, २८:६१-६३, १ सॅम. १२:१४-१५, १५:२२-२३, २ सॅम. प्रकरण. ११, १२:१-२३, जॉब ३६:७-१२, जेर. १२:१६-१७, १८:९-१०, रोम. २:५-१३, ६:१२-१६, एफि. ५:३-६, २ थिस. १:७-९, हिब. २:१-४

## आपल्या पृथ्वीभोवती घिरट्या घालणारे स्वर्गातील देवदूत !

*(पान १ वरून पुढे सुरू)*

वाढवणे प्रभुला शक्य आहे, परंतू हे प्रभू, ते सर्व लोक तुमचेच सेवक आहेत नव्हे का? असे असताना प्रभुला या गोष्टीची काय गरज आहे? इस्त्रायलवर अतिक्रमण करण्यास तो का कारणीभूत होईल? तरीदेखील, राजाचे शब्द जोएबपेक्षा वरचढ ठरले. ते पाहून जोएब तेथून निघून गेला आणि पूर्ण इस्त्रायल प्रवास करून जेरूसलेम येथे पोहोचला. मग जोएबने डेव्हिडला लोकांची संख्या सांगितली. आणि इस्त्राएलमधील लोकांची संख्या अकरा लक्ष [१,१००,०००] होती ज्यांनी हातात तलवारी घेतल्या होत्या; आणि जुडाहमधील तलवारी हातात घेतलेल्या लोकांची संख्या चार लक्ष सत्तर हजार [४७०,०००] होती. परंतु त्याने लेवी आणि बेंजामिन यांची त्या लोकांत गणना केली नाही कारण राजाचा शब्द जोएबसाठी घृणास्पद होता [जसा तो इश्वरासाठी देखील होता]

"आणि ईश्वराला याचा राग आला; त्यामुळे त्याने इस्त्रायलवर हल्ला केला. तेव्हा डेव्हिडने ईश्वराला म्हटले, "मी महापाप केले आहे, कारण मी असे कृत्य केले. पण मी तुला आता नम्र विनंती करतो की तुझ्या सेवकातील भेदभाव दूर कर. मी खरोखरचं मूर्खपणाने वागलो आहे. आणि ईश्वर डेव्हिडच्या सिद्धपुरूषाला [संदेष्ट्याला] म्हणाला जा डेव्हिडला सांग, मी तुला तीन गोष्टी देत आहे [ तीन शाप- त्यापैकी एकाची निवड कर]: त्याeपैकी एकाची निवड कर म्हणजे मी तुला त्याप्रमाणे करू शकेन. त्यानुसार गॅड डेव्हिडकडे गेला आणि त्याने ते तीन शाप डेव्हिडला ऐकवले: तीन वर्षे दुष्काळ; किंवा तुझे शत्रू तुझा नाश करून, तुझ्यापुढे निघून जातील त्या घटनेसाठी ३ महिन्यांचा अवधी; किंवा ईश्वरीय कोपाचे तीन दिवस, ज्यामध्ये सर्वत्र हाहाकार माजेल आणि ईश्वराचा दूत इस्त्रायलच्या सर्व किनाऱ्यांवरती विनाश घडवून आणेल. आता मला सांग की ज्याने मला इथे पाठवले त्याला तुझा कोणता संदेश देवू. आणि डेव्हिड गॅडला म्हणाला, "मी खूप मोठया अडचणीत सापडलो आहे, मला ईश्वराच्या हातात सोपव ले जाऊ दे कारण ईश्वर अत्यंत दयाळू आहे, परंतु मला माणसांच्या हातात पडू देवू नको.

"म्हणून मग ईश्वराने इस्त्रायलमध्ये हाहाकार माजवला: आणि इस्त्रायलमधील सत्तर हजार लोक मृत्यूमुखी पडले. मग ईश्वराने जेरूसलेमवर हल्ला करण्यासाठी एक देवदूत पाठवला [एक उडती तबकडी आणि ती चालवणार केवळ एकच देवदूत]: आणि जेव्हा तो [देवदूत] जेरूसलेमचा विनाश करत होता तेव्हा ईश्वर त्या विनाशाकडे पहात होता आणि त्याला या वाईट कृत्यांचा पश्चाताप झाला आणि ईश्वराने देवदूताला [पहारेकऱ्याला ] म्हटले, पुरे झाले, आता तुझा हात थांबव. त्यानंतर तो देवदूत ऑरनान जेबूसीटच्या, शेतातील खळयापाशी जाऊन थांबला. डेव्हिडने डोळे वर करून पाहिले तेव्हा त्याला देवाचा संदेष्टा स्वर्ग आणि पृथ्वी यांच्या मध्ये जेरूसलेमच्या दिशेने तलवार रोखून उभा असलेला दिसला.

"त्यानंतर डेव्हिड आणि इस्त्रायलमधील इतर ज्येष्ठ मंडळींनी, ज्यांनी गोणपाट परिधान केले होते [याचा अर्थ ते उपवास करत होते] त्यांचे चेहरे जमिनीवर टेकवले. आणि डेव्हिडने ईश्वराला म्हटले, "त्या लोकांची गणना करण्याची आज्ञा देणारा मीच नव्हे का? मी पाप केले असून खरोखरच दुष्टपणा केला आहे; परंतु या गरीब मेंढयांची काय चूक? त्यांनी काय पाप केले आहे? हे ईश्वरा मी तुला प्रार्थना करतो की तुझा हात माझ्यावर आणि माझ्या वडिलांच्या घरावर उगारला जावा परंतु या इतर लोकांना संहारामुळे येणारे दु:ख भोगायला लागू नये. त्या सर्वांना पीडा होऊ देऊ नको. मग ईश्वराच्या संदेष्ट्याने गॅडला (प्रेषिताला) आज्ञा दिली की त्याने डेव्हिडला जाऊन सांगावे की त्याने ऑरनान जेबूसाईटच्या खळयामध्ये ईश्वराला अर्पण करण्यासाठीच्या वस्तू ठेवण्यासाठी एक वेदी बांधावी. गॅडच्या सूचनेनुसार डेव्हिडने तशी पवित्र वेदी तयार केली.

"ऑर्नानने मागे वळून पाहिले, तेव्हा त्याला तो देवदूत दिसला; तेव्हा ऑर्नान आणि त्याच्या चार मुलांनी स्वत:ला लपवले. [ज्याप्रमाणे आजचे लोक, त्यांना उडत्या तबकड्या, युएफओ, ईश्वराचे संदेष्टे त्यांच्यावर फिरताना दिसल्यावर लपतात, या उडत्या तबकड्या काही दुसऱ्या ग्रहावरून आलेल्या नसतात परंतु स्वर्गातून आलेल्या असतात!] ऑर्नान गव्हाची मळणी करत होता. जेव्हा त्याने डेव्हिडला येताना पाहिले तेव्हा तो खळयातून बाहेर आला आणि त्याने डेव्हिडला वंदन केले. [जेव्हा ऑर्नानने देवदूताला येताना पाहिले आणि नंतर डेव्हिडकडे पाहिले तेव्हा त्याला देवदूत आणि डेव्हिड या दोघांमध्ये काहीतरी विलक्षण दुवा असल्याचे जाणवले. ऑर्नान घाबरला आणि त्याने डेव्हिडसमोर झुकून त्याला अभिवादन केले.] तेव्हा डेव्हिड ऑर्नानला म्हणाला या खळयातील थोडीशी जागा मला दे म्हणजे मला त्यामध्ये ईश्वरासाठी वेदी तयार करता येईल. यासाठी मी तुला पूर्ण मोबदला देईन; लोकांची पीडांपासून सुटका होईल. ऑर्ननने डेव्हिडला म्हटले,"मी तुला हवी ती जमीन देण्यास तयार आहे, हे राजा, तुझ्या दृष्टीने जे योग्य असेल त्यासाठी तू या जमिनीचा वापर करू शकतोस. मी तुला हे बैलसुध्दा, ईश्वराला बळी देण्यासाठी देईन. शेतीची लाकडी अवजारे लाकूडफाटयासाठी वापरायला देईन आणि मटणाच्या पदार्थांचा नैवेद्य तयार करण्यासाठी,त्यासाठी लागणारे गहू सुध्दा देईन. राजा डेव्हिड ऑर्नानला म्हणाला, मला हे सारे काही मोफत नको, कारण जे सारे तुझे आहे ते घेऊन मला ते ईश्वराला अर्पण करायचे नाही. पण मी निश्चितच त्यासाठीची किंमत द्यायला तयार आहे. त्यानंतर डेव्हिडने ऑर्ननला ६०० सोन्याच्या मोहोरा दिल्या आणि त्याच्याकडून ईश्वरासाठी वेदी करण्यासाठी जागा घेतली. डेव्हिडने तिथे पवित्र वेदी बांधून प्रभूला अग्नीत भाजलेल्या पदार्थांचा नैवेद्य दाखवला आणि शांतीसाठी प्रार्थना केली आणि ईश्वराचा धावा केला; आणि त्याने [ईश्वराने] वेदीवर स्वर्गातून अग्नी पाठवून त्याला उत्तर दिले आणि देवदूताला आज्ञा केली की त्याने आपली तलवार पुन्हा म्यानांत ठेवून द्यावी.

"ज्या वेळी डेव्हिडने पाहिले की ईश्वराने,ऑर्नान जेबूसाईटमधल्या खळयातील, त्याने बांधलेल्या पवित्र वेदीवर आपले अस्तित्व दाखवले आहे, तेव्हा त्याने तिथे बळी दिला. ईश्वराच्या तात्पुरत्या वास्तव्यासाठी, मोझेसने रानटी भागात प्रभूचे निवासस्थान बनवले होते आणि प्रभूला अग्नीत भाजलेल्या पदार्थांचा नैवेद्य दाखवता यावा यासाठी गिबॉन येथील उंच प्रदेशांत मोझेसने वेदी बांधली होती. परंतु ईश्वराची चौकशी करण्यासाठी डेव्हिड तेथे जाऊ शकला नाही कारण: त्याला ईश्वराच्या संदेष्ट्याच्या हातामध्ये असलेल्या तलवारीची भिती वाटत होती." (इतिवृत्त २१:३-३०). बायबलमध्ये अनेक ठिकाणी सांगितले आहे की ईश्वर

## मलावी

प्रिय बंधू,

ईश्वराच्या नावे आपल्याला शुभेच्छा! मला तुम्हाला सांगायचे आहे की तुम्ही पाठवलेले पार्सल अगदी गरजेच्या वेळी पोहोचले. आम्ही थानडिझी ट्रेडिंग सेंटर येथे, त्यातील साहित्याचे वाटप केले, आणि तिथे अनेक लोकांनी येशूचा, आपला ईश्वर म्हणून स्वीकार केला. आमेन! आम्ही विनंती करतो की कृपया बायबलच्या, द मसीहा आणि वार्तापत्राच्या आणखी काही प्रती, वाटपासाठी आपण नि:संकोचपणे पाठवाव्यात.

त्याचप्रमाणे आमच्या गटसदस्यांसाठी टी शर्ट देखील पाठवावेत.

आम्ही सारेजण पॅस्टर टोनी अलामो आणि त्यांची मिनिस्ट्री ज्या परिस्थितीतून जात आहे त्यामधून बाहेर येण्यासाठी आम्ही नेहमीच प्रार्थना करतो.

ईश्वरकृपेने आपला,
इव्हान्स नौलिया — लिंबे, मलावी

त्याच्या संदेष्ट्यांचा उपयोग शाप देण्यासाठी आणि विनाश करण्यासाठी करतो[5].

वृध्द प्रेषित नाहम ह्यांना, आजच्या काळातील स्वयंचलित वाहनांबद्दल आणि आजच्या महामार्गांबद्दल आधीच ज्ञान झाले होते. नाहम २:४ ने म्हटले, "रथ रस्त्यांतून मोकाटपणे धावत आहेत. चौकांमधून ते पुढे-मागे कसेही पळत आहेत. ते जळत्या मशालीप्रमाणे किंवा ठिकठिकाणी तळपणाऱ्या विजेप्रमाणे दिसत आहेत. रस्त्यातून रथ बेफाम चालले आहेत, सडकांवर ते एकमेकांवर आदळत आहेत, ते मशालीसारखे दिसत आहेत, ते विजेसारखे धावत आहेत."

वाहने आणि महामार्गांबद्दलचे हे वर्णन म्हणजे काळाचा अंत जवळ आल्याची भविष्यवाणी आहे.

इतर कोणत्याही ग्रहावर किंवा ईश्वर निर्मित इतर कोणत्याही स्थळी जीवसृष्टी नाही,म्हणूनच उडत्या तबकड्या किंवा उडणाऱ्या इतर अनोळखी वस्तू परग्रहाहून येत असतात असे मानणे हे बुध्दीला अजिबात न पटणारे आहे आणि चुकीचे आहे, या तबकड्या स्वर्गातून येत असतात.

ईश्वराला, इतर कोणत्याही गोष्टींपेक्षा त्याच्यावर श्रध्दा, विश्वास असायला हवा असतो आणि जेव्हा आपण त्याच्या आज्ञा-वचनांचे पालन करत नाही तेव्हा, आपण त्याच्यावर विश्वास ठेवत नसल्याचे त्याला कळते. ईश्वराने त्याच्या स्वर्गाबद्दल आणि पृथ्वीबद्दल बोलताना असे शब्द उद्गारले आहेत. उत्पत्ति, १:१४-१५ मध्ये म्हटले आहे, "मग देव बोलला "दिवस आणि रात्र ही वेगळी करण्यासाठी आकाशात ज्योति होवोत [इथे पृथ्वीवर, इतर कोणत्याही गृहावर नव्हे] आणि त्या विशेष चिन्हे, आणि विशेष मेळावे, ऋतू, दिवस, आणि वर्षे दाखविणाऱ्या होवोत. [पुन्हा, इथे पृथ्वीवर, इतर कोणत्याही गृहावर नव्हे] पृथ्वीला [ मंगळ, गुरू, मर्क्युरी, किंवा इतर कोणत्याही गृहावर नव्हे] प्रकाश देण्यासाठी आकाशात त्या ज्योति होवोत." आणि तसे झाले.

असे समजू नका की सध्या जो भ्रष्टाचार आणि हिंसाचार सुरू आहे त्यापासून तुमचा बचाव होईल उलट या गोष्टी तुम्ही जिला "माता पृथ्वी" म्हणता त्यावर अधिकच वाढत जातील. तुम्हाला इतर कोणत्याही ग्रहावर राहायला जायला मिळेल असे समजू नका, कारण इतर कोणत्याही ग्रहावर जीवसृष्टी जिवंत राहू शकत नाही. तुम्हाला पृथ्वीवर शांती मिळू शकणार नाही कारण आपण भ्रष्ट लोक आहोत, आणि आपल्या हृदयांत ईश्वराला स्थान नसल्याने आपण नेहमीच भ्रष्ट राहू. कृपा करून, युएफओ, उडत्या तबकड्या, पहारेकरी, संदेष्ट्ये हे दुसऱ्या गृहावरून आलेले असतात ही खुळचट कल्पना तुमच्या डोक्यातून काढून टाका. तुम्ही जर अशा खोट्या गोष्टींवर विश्वास ठेवत असाल तर, ईश्वराने तुमच्यासाठी पाठलेल्या भ्रमाचा तो परिणाम आहे, ज्याचा उल्लेख त्याने २ थेस्सलनीकाकरांस २: ८-१२ मध्ये केला आहे. "आणि मग तो दुष्ट [ सैतान, ख्रिस्तविरोधक] प्रकट होईल. प्रभु येशू त्याला आपल्या मुखातील श्वासाने मारुन टाकील आणि प्रभु जेव्हा त्याच्या येण्याच्या वेळी मोठ्या वैभवाने प्रकट होईल तेव्हा तो त्याचा नाश करील. दुष्टाचे येणे सैतानाच्या सामर्थ्याने [सैतानाची कमकुवत आणि उसनी घेतलेली ताकद] होईल आणि त्याच्या येण्याबरोबर खोटे चमत्कार [जसे देवदूत किंवा उडत्या तबकड्या परग्रहावरून आलेल्या असतात किंवा इतर ग्रहांवर जीवसृष्टी आहे, आणि तिथे गेल्यास तुम्ही पृथ्वीवरच्या दुराचारापासून आणि भ्रष्टाचारापासून स्वत:चा बचाव करू शकाल.] चिन्हे आणि अद्‌भुत गोष्टी घडतील. आणि जे नरकाच्या वाटेवर आहेत त्यांच्याविरुद्ध प्रत्येक प्रकारची दुष्टता फसवणूक [उदा. समलिंगी विवाह करणे चुकीचे नाही, गर्भपात करणे, खून करणे चुकीचे नाही, [6] समलैंगिकता[7], विवाह बाह्य संबंध[8], व्यभिचार करणे[9] चुकीचे नाही, अंमली पदार्थांचे सेवन करणे, दारू पिणे[10] चुकीचे नाही. दुसऱ्यांच्या व्यंगावर हसणे, त्यांचा उपहास करणे चुकीचे नाही[11], चोरी करणे[12], ईश्वराची निंदा करणे चुकीचे नाही[13], ईश्वरावर मनापासून, अंत:करणपूर्वक प्रेम न करणे चुकीचे नाही.[14], ईश्वराची सेवा न करणे आणि लोभीपणा दाखवणे चुकीचे नाही[15]] व्हावी म्हणून तो आणील, कारण त्यांनी सत्यावर प्रेम करण्याचे नाकारले. यासाठी की त्यांचे तारण होणे शक्य व्हावे. आणि या कारणासाठी देवाने त्यांना भ्रम पडेल असे केले. यासाठी की, जे खोटे [जसे युएफओ परग्रहावरून येतात, जणू काही इतर ग्रहावर जीवन आहे] आहे त्यावर त्यांनी विश्वास ठेवावा. आणि त्यांनी सत्यावर विश्वास ठेवला नाही तर दुष्टतेत आनंद मानला, त्यांना शिक्षा मिळावी."

उत्पत्ति १ मध्ये काय सांगितले आहे ते पाहुया: "ईश्वराने दोन मोठ्या ज्योति निर्माण केल्या. दिवसावर सत्ता चालविण्यासाठी मोठी ज्योति [सूर्य] आणि रात्रीवर सत्ता चालविण्यासाठी लहान ज्योति, [चंद्र] आणि त्याने तारेही निर्माण केले. ईश्वराने त्या ज्योति पृथ्वीवर [इतर कोणत्याही ग्रहावर नव्हे] प्रकाश पाडण्यासाठी आणि दिवसावर आणि रात्रीवर सत्ता चालविण्यासाठी आकाशात ठेवल्या. त्या ज्योतींनी प्रकाश आणि अंधार वेगळे केले. आणि देवाने पाहिले की हे चांगले आहे. (उत्पत्ति १:१६-१८)

आता तुम्ही कोणत्या गोष्टींवर विश्वास ठेवाल? जे चांगले आहे त्यावर की जे वाईट ,अपप्रवृत्तींनी भरलेले आहे त्यावर? ईश्वराने आपल्याला पृथ्वीवरच्या धाणीपासून निर्माण केले यावर तुम्ही विश्वास ठेवाल की शास्त्रज्ञांवर? तुम्ही ईश्वरावर विश्वास ठेवाल की कार्बन डेटिंग यंत्रांवर? दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे, ईश्वराच्या म्हणण्याप्रमाणे या जगाची निर्मिती

*(पान ४ वर पुढे सुरू)*

५ जेन. १९:१-२५, नम. २२:१-३५, २५:१-९, २ सॅम. २४:१-१७, २ किंग्ज १९:३५, १ क्रॉन.२१:९-३०, २ क्रॉन.३२ :१९-२२, रेव. ७:१-२, प्रकरण ८, ९:१-५, १३-२१, १४:८-११, १५-२०, प्रकरण. १६, १८:१-२, २१, १९:१७-२१, २०:१-३, २१:९

६जेन. ९:५-६, एक्स. २०:१३, २१:१२-१५, २२-२३, लेव. २४:१७, नम. ३५:१६-२१, ३०-३३, डयूश. ५:१७, २७:२४-२५, सा. १३९:१३-१६, प्रोव.१ :१०-१६, ६:१६-१८, जेर. १:५, मॅथ्यू. १९:१८, मार्क १०:१९, ल्युक १८:२०, रोम. १३:९, गाल. ५:१९-२१, १ टिम. १:९-१०, जेम्स २:११, १ जॉन ३:१५, रेव. ९:२०-२१, २१:८, २२:१४-१५ **७** जेन. १९:१-१३, २४-२५, लेव. १८:२२, २०:१३, डयूश. २२:५,२३:१७, जज. १९:२२-२५, रोम. १:२०-३२, १ कोर. ६:९-१०, १ टिम. १:९-१०, २ टिम. ३:१-५, ज्युड ७ **८** एक्स. २०:१४, लेव. १८:२०, २०:१०, डयुश. ५:१८, २२-२४, १ किंग्ज १४:२४, १५:११-१२, प्रोव. ६:२९, ३२-३३, जेर. ५:८-९, इझेक. १८:१०-१३, २२:११, माल. ३:५ मॅथ्यू. ५:२७-२८, १५:१९-२०, १९:१८, मार्क ७:२१-२३, ल्युक १८:२०, रोम. १३:९, १ कोर. ६:९-१०, जेम्स २:१०-१२ **९** १ कोर. ५::९-११, ६:९-१०, १३-१८, ७:२, १०:७-८, २ कोर. १२:२१, इफ. ५:३, कोल. ३:५-६, १ थिस. ४:३-५, ज्युड ७, रेव. २:१४, २०-२२, ९:२०-२१ **१०** डयुश. २१:२०-२१, प्रोव. २३:२१, २९-३५, ३१:४-५, इसा.५ :११, २२-२३, २८:१-४,नाहम १:९-१०, ल्युक २१ :३३-३६, रोम. १३:१२-१४, १ कोर. ५:१०-१२, ६:९-१०, गाल. ५:१९-२३, १ थिस . ५:६-८, १ टिम. . ३:८-९, टिटस १:७-९, २:१-५, १ पीट. ४:१-५, २ पीट. १:५-८ **११** इक्ले.२:१-३, ७:२-६, मॅथ्यू.१२:३६, इफ. ५:३-४, १ टिम. २:९-१०, १५, टीटस २:१-८, १२, १ पीट. १:१३-१६, ४:७, ५:८ **१२** एक्स. २०:१५, २२:१-४, लेव. १९:११, १३, डयुश. ५:१९, झेक. ५:३,मॅथ्यू.१५:१९-२०, १९:१८, मार्क ७:२१-२३, ल्युक १८:२०, १९:४५-४६, रोम. १३:९, १ कोर. . ६:१०, एफ. ४:२८, रेव. ९:२१ **१३** लेव.२४:११-१६,२३, मॅथ्यू.१२:२२-३२,१५:१९-२०, ल्युक१२:९-१०, रेव. १३:१-९, १४:८-११, १७:१-९ **१४** डयुश. ४:२९, ६:५, १०:१२, ११:१३, १३:३-४, २६:१६, ३०:६, जोश. २२:५, मॅथ्यू. २२:३७-४० **१५** एक्स. १८:२१, २०:१७, डयुश ५:२१,सा.१०:३, मिका २:१-३, मार्क ७:२१-२३,रोम. १:२८-३२, १३:८-९, १ कोर. ५:९-११, ६:९-१०, एफ.५:१-५, कोल.३:५-६,२टिम.३ :१-५, २ पीट. २:१-३, १२-१४, १ जॉन २ :१५-१७

## भारत

प्रिय बंधू आणि भगिनींनो, तुम्हाला हार्दिक शुभेच्छा ! आज आम्हाला तुमचे सुरेख साहित्य मिळाले.

आम्हाला खूप आनंद झाला आहे कारण माझ्या बाप्तिस्मा सेवेबाबतचे फोटोसुध्दा तुमच्या वार्तापत्रांत छापून आलेले आहेत. तुमच्या प्रार्थनारूपी पाठिंब्यामुळे, आम्ही ४, ५ आणि ६ मार्च रोजी गॉस्पेलची शिकवण देणाऱ्या सभा यशस्वीपणे पार पाडल्या. त्याबाबतचे फोटो मला तुम्हाला पाठवायचे आहेत. या बैठकांमधून आम्ही ईश्वराच्या शक्तीबद्दल प्रबोधन केले. या बैठकांतून अनेक हिंदू लोकांनीसुध्दा मुक्तीबद्दलची, ईश्वराची योजना जाणून घेतली.

इथे आम्ही सर्व जण पॅस्टर टोनी अलामो यांच्या आरोग्यासाठी आणि त्यांच्या मिनिस्ट्रीसाठी प्रार्थना करत आहोत. ईश्वर सर्वांना सुखी ठेवो.

तुमचा बंधू,
सॉलमन राजू कोला.
आंध्र प्रदेश, भारत



अलामो मिनिस्ट्री ऑन लाईन
www.alamoministries.com

## आपल्या पृथ्वीभोवती घिरटया घालणारे स्वर्गातील देवदूत !

*(पान ३ वरून पुढे सुरू)*

६००० वर्षांपूर्वी झाली यावर तुम्ही विश्वास ठेवाल की नास्तिक लोकांच्या म्हणण्यानुसार हे जग लाखो, किंवा कोटी वर्षांपूर्वी निर्माण झाले यावर विश्वास ठेवाल? जे लोक ईश्वराचा शब्द, बायबलऐवजी खोट्या गोष्टींवर विश्वास ठेवत असतील त्यांच्यावर भ्रमाचा परिणाम झाला आहे आणि ते धिक्कारले गेले आहात.१६ तुम्ही अशा भ्रमामध्ये नसावेत अशी आशा आहे. जर तुम्हाला वाचायचे असेल ईश्वर म्हणजेच पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा आणि ज्यांनी ईश्वराचा पूत्र येशू ख्रिस्ताद्वारे ईश्वरावर विश्वास ठेवला त्यांच्यासमवेत अनंतकाळ स्वर्गामध्ये वास्तव्य करायचे असेल तर खाली दिलेली प्रार्थना म्हणा:

हा पूर्ण प्रदेश सर्व लोकांना व खास करून जे लोक समलिंगी संबंध आणि स्त्री समलिंगी संबंध चालू ठेवण्याची शिफारस करतात त्या सर्व अनीतीचे धडे शिकवणाऱ्या लोकांना, ईश्वर खरोखरचं अस्तित्वात असतो याची साक्ष देतो. हे सर्व पाहिल्याबर तुम्हाला समजेल की ईश्वर ही काही उगाच थट्टा मस्करी करत नाही. तो जे सांगतो ते सत्य असते. [८] आता वेळेचा अंत झाला आहे म्हणूनच जेव्हा तुम्ही खाली दिलेली प्रार्थना म्हणाल तेव्हा त्या प्रार्थनेची मस्करी करू नका:

**"हे प्रभू आणि हे ईश्वरा, माझ्या आत्म्यावर, एका पाप्यावर दया कर.[१७] माझा विश्वास आहे की येशू ख्रिस्त हा जिवंत ईश्वराचा पुत्र आहे.[१८] माझा विश्वास आहे की त्याने माझी आधीची सर्व पापे माफ व्हावीत यासाठी तो सुळावर मृत्यू पावला आणि स्वत:चे मौल्यवान रक्त सांडले.[१९] माझा विश्वास आहे कि ईश्वराने पवित्र आत्म्याच्या शक्तीद्वारे येशूला मृतावस्थेतून उठवले आहे,[२०] आणि ईश्वराच्या उजव्या बाजूला बसून तो या क्षणाला माझ्या पापांचा कबुलीजबाब आणि ही प्रार्थना ऐकत आहे.२१ हे येशू ख्रिस्ता, मी माझ्या हृदयाचे दार उघडून तुला माझ्या हृदयात येण्याचे आमंत्रन देत आहे.२२ तु माझ्याऐवजी कँवलरी येथे क्रुसावर जे रक्त सांडलेस त्या मौल्यवान रक्ताने माझी सर्व घाणेरडी पापे धुवून काढ. [२३] हे येशू ख्रिस्ता, तू मला दूर करणार नाहीस आणि माझ्या सर्व पापांना माफ करशील आणि माझ्या आत्म्याला वाचवशील. हे मला माहित आहे कारण तुझा शब्द म्हणजेच बायबल तसे सांगते[२४]. तुझा शब्द सांगतो की तू कोणालाही दूर लोटणार नाहीस आणि त्यामधे माझाही समावेश होतो.[२५] म्हणूनच मला माहित आहे की तू माझी प्रार्थना ऐकली आहेस मला माहित आहे की तू माझ्या हाकेला उत्तर दिले आहे आणि मला माहित आहे की तू मला वाचवले आहेस.[२६] हे येशू ख्रिस्ता, माझा आत्मा वाचवल्याबद्दल मी तुझे आभार मानतो आणि तुझी आज्ञा मानून आणि यापुढे आणखी कोणतेही पाप न करून माझी कृतज्ञता व्यक्त करतो[२७]**

---

मुक्ती मिळाल्यानंतर, पिता पुत्र व पवित्र आत्म्याच्या नावाने पाण्यात पूर्णपणे बुडवून, आपण बाप्तिस्मा घ्यावयाचा आहे[२८] बायबलचा नीट सखोलपणे अभ्यास करा आणि ते जे सांगते ते करा.[२९]

प्रभूला वाटते की तुम्ही इतरांना तुमच्या मुक्तीबद्दल सांगावे. आपण धर्मोपदेशक टोनी अलामोच्या गॉस्पेल देणाऱ्या साहित्याचे वितरक होऊ शकता. आम्ही ते आपल्याला मोफत देऊ. आम्ही आपणास हे साहित्य मोफत देवु. अधिक माहितीसाठी आम्हाला कॉल करा किंवा ई-मेल करा. हा संदेश इतरांपर्यंत पोहचवा.

जर तुम्हाला येशूच्या आदेशानुसार, हे जग वाचले जावे असे आपल्याला वाटत असेल तर ईश्वराला टायथिस आणि प्रसादापासून वंचित ठेवू नका. ईश्वराने म्हटले, मणुष्य देवाला ठकवील काय? तुम्ही तर मला ठकविले आहे; असे म्हणून तुम्ही म्हणता आम्ही कोणत्या बाबतीत तुला ठकविले आहे? दशमांश (टायथिस) आणि अर्पणे यासंबंधाने. तुम्ही एका शापाने शापित झाला आहात: कारण तुम्ही आणि या पूर्ण राष्ट्राने आणि [संपूर्ण जगाने] मला लुटले आहे.सेनाधीश परमेश्वर म्हणतो, माझ्या मंदिरात अन्न असावे म्हणून सगळा दशमांश (टायथिस-तुमच्या एकूण उत्पन्नाचा दहावा हिस्सा) तुम्ही भांडारात आणा म्हणजे मी आकाशकपाटे उघडून जागा पुरणार नाही एवढा आशीर्वाद तुम्हाकरिता वर्षितो की नाही याविषयी माझी प्रतीती पाहा. तुमच्या भूमीच्या पिकाची नासाडी होऊ नये म्हणून ते खाऊन टाकणाऱ्यास मी तुम्हासाठी धमकावीन; तुमच्या बागेतील द्राक्षलतांचे फळ अकाली गळणार नाही असे सेनाधीश ईश्वर म्हणतो." (मलाखी ३ :८ -१२ )

---

**१६** इसा.६६:३-४, २ थिस.२:३-१२ **१७** पिसा. ५१:५, रोम. ३:१०-१२, २३ **१८** मॅथ. २६:६३-६४, २७:५४, ल्युक १:३०-३३, जॉन ९:३५-३७, रोम. १:३-४ **१९** अॅक्ट्स ४:१२, २०:२८, रोम. ३:२५, १जॉन १:७, रेव. ५:९ **२०** पिसा. १६:९-१०, मॅथ. २८:५-७, मार्क १६:९, १२:१४, जॉन २:१९, २१, १०:१७-१८, ११:२५, अॅक्ट्स २:२४, ३:१५, रोम. ८:११, १ कोर. १५:३-७ **२१** ल्युक २२:६९ अॅक्ट्स २:२५-३६, हिब.. १०:१२-१३ **२२** १ कोर. ३:१६, रेव. ३:२० **२३** ईफ. २:१३-२२, हिब. ९:२२, १३:१२, २०-२१, १ जॉन १:७, रेव. १:५, ७:१४ **२४** मॅथ. २६:२८, अॅक्ट्स २:२१, ४:१२, ईफ. १:७, कोल. १:१४ **२५** मॅथ. २१:२२, जॉन ६:३५, ३७-४०, रोम. १०:१३ **२६** हिब. ११:६ **२७** जॉन ५:१४, ८:११, रोम. ६:४, १कोर. १५:१०, रेव. ७:१४, २२:१४ **२८** मॅथ. २८:१८-२०, जॉन ३:५, अॅक्ट्स २:३८, १९:३-५ **२९** ज्यूश. ४:२९, १३:४, २६:१६, जोश. १:८, २२:५, २ टिम. २:१५, ३:१४-१७, जेम्स १:२२-२५, रेव. ३:१८

*कृपया अधिक माहितीसाठी व तुम्हाला रस वाटू शकेल अशा इतर विषयांवरील लेखनसाहित्यासाठी आमच्याशी संपर्क करा.*

**टोनी अलामो, जागतिक पॅस्टर, टोनी अलामो ख्रिश्चन मिनिस्ट्रीज वर्ल्डवाईड, पोस्ट बॉक्स २९४८ , हॉलिवूड, कॅ. ९००७८**

**प्रार्थना व माहितीकरिता २४ तास उपलब्ध: (६६१ ) २५२ -५६८६ • फॅक्स (६६१ ) २५२ -४३६२**

**www.alamoministries.com • taoffice@alamoministries.com**

*यू.एस.मधील ज्या व्यक्तीं, आपले तन, मन, हृदय, ताकद व आत्मा अर्पून ईश्वराची सेवा करतील, अशा व्यक्तींना जगभरातील, टोनी अलामो ख्रिश्चन मिनिस्ट्रिज, अशी जागा पुरवते की जिथे जगण्यासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी मिळतील*

**न्यूयॉर्क शहरांत दर मंगळवारी रात्री ८ वा. व इतर ठिकाणी प्रत्येक रात्री सेवा आयोजित करण्यात येतात.अधिक माहिती-साठी कृपया (९०८ ) ९३७ - ५७२३ या क्र.वर फोन करा.**

प्रत्येक सेवेनंतर जेवण दिले जाईल.

ख्रिश्चन पॅस्टर अलामो यांनी लिहिलेले पुस्तक "द मसीहा" मागून घ्या. यामध्ये जुन्या करारामधील ३३३ च्यावर गोष्टींतून ख्रिस्ताबाबतचा पुरावा दिला आहे.

*धर्मोपदेशक अलामो यांच्या लेखी साहित्याचे वाटप करून लोकांची आत्मोन्नती करणारे सेवक म्हणून काम करा.*

*आमचे सर्व लेखी साहित्य व ऐकण्याचे संदेश ,शिपिंग शुल्कासह, नि:शुल्क पाठवले जातात.*

*जर त्यासाठी कुणी तुमच्याकडून पैसे घेत असेल तर कृपया पुढील क्र. वर फोन करा. (६६१ ) २५२ -५६८६ कलेक्ट.*

**या लेखी साहित्याद्वारे मुक्तीसाठी खरा मार्ग कोणता हे दाखवले जाते. (प्रेषितांची कृत्ये४ :१२ ).**

**हे साहित्य फेकू नका. कृपया दुसऱ्या कोणाला तरी ते वाचायला द्या.**

**जे कोणी दुसऱ्या देशांमध्ये असतील त्यांनी कृपया हे साहित्य त्यांच्या देशांतील बोली भाषांमध्ये अनुवादित करावे.**

**जर आपण हे साहित्य पुन्हा प्रकाशित करणार असाल तर कृपया खालील कॉपीराईट व रजिस्ट्रेशनचा समावेश करा.**

**© कॉपीराईट एप्रिल २०१५ सर्व हक्क राखीव जागतिक पॅस्टर, टोनी अलामो. ® एप्रिल २०१५ मधे नोंदणीकृत केले.**

MARATHI—VOLUME 17700—*HEAVENLY ANGELS HOVERING OVER OUR PLANET*